दिनांक : - २०.११.२०२०

# सिडको पोलिस कर्मचाऱ्यांकरिताची महागृहनिर्माण योजना जुलै -२०२० मधील अर्जदारांना ऑनलाइन कागदपत्रे जमा करण्यासंदर्भातील सूचना

उपरोक्त योजनेच्या दिनांक १०.११.२०२० रोजी घेण्यात आलेल्या संगणकीय सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी दिनांक ०१.१२.२०२० ते दिनांक १५.१२.२०२० च्या दरम्यान ऑनलाइन पद्धतीने होईल. त्या करिता सिडको निवारा केंद्राच्या संकेतस्थळावर लॉगिन करून कागदपत्रे जमा करावीत व त्याचबरोबर अर्जदाराने सर्व कागदपत्राच्या मूळ प्रति व एक झेरॉक्स सेट (**Xerox set**) स्वयंसाक्षांकीत करून सिडको निवारा केंद्र येथे जमा करणे आवश्यक राहील. जे अर्जदार या कालावधीत ऑनलाईन कागदपत्रे अपलोड करणार नाहीत व निवारा केंद्र येथे कागदपत्रे जमा करणार नाहीत अशा अर्जदारांची कागदपत्रे सदर कालावधीनंतर कोणत्याही सबबीवर जमा करून घेतली जाणार नाहीत,याची नोंद घ्यावी. तसेच अशा अर्जावर नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

**ज्या अर्जदारांनी कागदपत्रे जमा करावयाची आहेत अशा अर्जदारांनी सदर कागदपत्रे सिडको निवारा केंद्र पत्ता टी - २७१, आठवा मजला, टॉवर क्रमांक - १०, बेलापूर रेल्वेसंकुल, बेलापूर, नवी मुंबई येथे व्यक्तिश: किंवा टपालाने जमा करावीत. सिडको कार्यालय, रायगड भवन येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने पाठवलेली कागदपत्रे पुढील कार्यवाही साठी ग्राह्य धरली जाणार नाहीत. तसेच या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी पूर्णपणे अर्जदारांची राहील.**

**अर्जदारांना ऑनलाइन कागदपत्रे जमा करण्याबाबत काही अडचणी आल्यास सिडको निवारा केंद्र हेल्पलाइन क्र . 022-62722250 वर संपर्क साधावा किंवा सिडको निवारा केंद्र येथे भेट द्यावी. दि. १५/१२/२०२० नंतर कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.**